Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १११ • Title - Code :- MAHMAR49513 •मंगळवार दि.१६ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आधी ५० खोके होते आता ५० लोकं;एका सहीसाठी राष्ट्रीय शिष्टमंडळ कशाला?

## मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावर आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई–**आधी ५० खोके होते आता हे ५० लोकं घेऊन जात आहेत असे म्हणत युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दावोस दौऱ्यावर टीका केली आहे. वऱ्हाड निघाले लंडनला तसं हे वऱ्हाड निघाले दावोसला असा टोलाही आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे. आदित्य ठाकरे मुंबईत बोलत होते.ते पुढे म्हणाले, सध्याचे खासदार, माजी खासदार, खासगी एजन्सींचे काही प्रचारक, मुख्यमंत्र्याचे ओएसडी यांचा यात समावेश आहे. या शिष्टमंडळात कोणीही बिझनेसमॅन नाहीत. येथे ५० लोक काय करतील? तिथं फक्त सामंजस्य करारांवर मुख्यमंत्री स्वाक्षरी करतील, सामंजस्य करारावर फक्त सरकारचे प्रमुख आणि संबंधित अधिकारी आवश्यक आहेत. इतके मोठे राष्ट्रीय शिष्टमंडळ कशाला? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.आदित्य ठाकरे यांनी या दौऱ्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच मुख्यमंत्री म्हणून जेव्हा तुम्ही दावोसला जाता तेव्हा केंद्रीय परराष्ट्र खातं आणि अर्थ खातं यांच्याकडून संमती दिली जाते. या खात्यांकडे १० लोकांनी परवानगी मागितली होती आणि परवानगी दिली गेली आहे. आता ५० लोक जात आहेत ती संमती घेतली आहे की नाही? हे सगळे मजा करायला चालले आहेत की काम करायला चालले आहेत? असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे.दाओसला तीन ते चार दलाल मित्र आहेत त्यांना सुद्धा सोबत घेऊन जात आहेत. सही मुख्यमंत्री करणार आहेत मग एवढ्या लोकांची गरज आहे का? महाराष्ट्र सरकारचा पैसा यामध्ये जातोय म्हणजे आपला सगळ्यांचे पैसे जात आहे, असा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला आहे.दरम्यान, १५ ते १९ जानेवारी दरम्यान स्वित्झर्लंडमधील दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम होणार आहे. यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिष्टमंडळासह दाव्होसला जाणार असून राज्याचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे जाहीर केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत आणि १० सदस्यीय शिष्टमंडळ दाव्होस येथे सहभागी होणार असल्याची माहिती आहे. मात्र आदित्य ठाकरे यांनी याच दौऱ्यावर टीका केली आहे.





# शंकरपूर येथे संत जगनाडे महाराज पुण्यतिथी साजरी

**चिमूर | प्रतिनिधी**

श्री.संताजी जगनाडे महाराज देवस्थान व श्री.संताजी तेली समाज शंकरपुर ता. चिमूर जि. चंद्रपूर च्या वतीने संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव, समाज प्रबोधन, गुणगौरव सोहळा, गोपाल काला, कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष प्रा. विठ्ठलराव निखुले, कार्यक्रमाचे उद्घाटक प्रशांत कामडे अधक्ष. विदर्भ तेली समाज नागपूर, कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती बंटी भांगडीया आमदार चिमूर विधानसभा क्षेत्र, तर कार्यक्रमाचे विशेष अतिथी सतीश वारजूकर माजी अधक्ष जी.प. चंद्रपूर, साईश वारजूकर सरपंच ग्रा.प.शंकरपूर, धनराज मुंगले ओ.बी.सी संघटक, योगेश समरीत संयोजक महाराष्ट्र ते. स. संघर्ष स.चंद्रपूर, ममता डुकरे मा. जि. सद्स्या चंद्रपूर, रोशन ढोक मा. उपसभापती प.स.चिमूर, भावना बावनकर मा.स.प.स.चिमूर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामदास सहारे भंडारा, रामू सहारे भंडारा, डॉ. परसराम नागोसे ब्रम्हपुरी, भाऊराव



बावनकर, बंडू चौधरी, घनश्याम डुकरे भिसी, ईश्वर डुकरे चिमूर, विनोद नागोसे चींधीचक, वंदना सहारे, अनिल शेंडे गंगाधर चौधरी, सतीश देव्हारे खडसंगी, मनोज सहारे मालेवाडा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.संताजी जगनाडे महाराज देवस्थान कमेटी चे.अधक्ष अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले व आपल्या समजा विषयी मत मांडले त्यानंतर आमदार बंटी भांगडीया यांचे तेली समाजाच्या व देवस्थान कमेटी च्या वतीने सत्कार करण्यात आला आपल्या सत्कारमूर्ती भाषणात सांगितले की तरुण पिढी ला मार्गदर्शन करताना तरुण पिढी व्यसनमुक्ती कडे वळत चला व भरपूर समाजाला मार्गदर्शन केले व श्री.संताजी जगनाडे महाराज देवस्थानाला २ कोटी निधी मंजूर करून देतो असे आश्वासन दिले यावेळी संपूर्ण विदर्भातील आलेले पाहुणे मंडळी व समाज बांधव उपस्थित होते कार्यक्रमांचे सूत्र संचालन संकेत आदमने व आचल आदमने यांनी केले आभार प्रदर्शन बंडू भजभुजे यांनी केले.

# चंद्रपूर गडचिरोली जिल्हा महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची सभा संपन्न

**वरोरा | प्रतिनिधी**

विदर्भ शासकीय महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटना चंद्रपूर गडचिरोली जिल्हा संघटनेची सभा महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय बल्लारपूर येथे संघटनेचे अध्यक्ष मनोज धोंगडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.सभेत क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. सभेला प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर चव्हाण महाविद्यालय व विद्यापीठ कृती समितीचे अध्यक्षअजय देशमुख, विदर्भ संघटनेचे महासचिव संदीप हिवरकर उपस्थित होते.

प्राचार्य डॉक्टर चव्हाण यांनी संघटनेमध्ये काम करत असताना पदाबाबत स्पर्धा नसावी तसेच पदाच्या स्पर्धेमुळे संघटनेमध्ये मतभेद निर्माण होते असे मत व्यक्त केले. अजय देशमुख यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठ कृती समितीचे सातवा वेतन आयोग लागू करण्यात तसेच १२ व २४ वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात संघटनेची महत्त्वाचे योगदान आहे असे सांगितले .त्याचप्रमाणे



१०/ २० आणि ३० या तीन लाभाची योजना येथे सात आठ महिन्यात लागू होईल तसेच सातव्या वेतन आयोगाची थकबाकी लवकरच जमा होईल असे सांगितले.सभेला संघटनेचे अध्यक्ष मनोज धोंगडे, सचिव तिलक बांगडे, कोषाध्यक्ष नरेश गोंडाने उपाध्यक्ष अशोक बेजनवार, मुकेश घटे ,संघटक कु कविता उईके विदर्भ संघटनेचे पदाधिकारी कृष्णा बावनथडे ,कमलाकर डुकरे महासंघ पदाधिकारी सुनील चिमूरकर विजयकुमार घरत ,सल्लागार विजयकुमार जांभुळकर, देवानंद अलोने ,भूपेश साखरे, सुमित शिर्के, आनंदराव तावाडे ,सचिन नक्षीने ,मोहन पिंपळे, प्रदीप राऊत संजय झाडे, श्रीहरी ठमके ,अरविंद नवले , प्रफुल थुटे, मिलिंद मेश्राम तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच सूत्रसंचालन विदर्भ संघटनेचे सचिव प्रकाश मेश्राम यांनी केले .कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता अशोक गारगेलवार, दरेकर ,मोरे यांनी सहकार्य केले

# गर्दैवाडा येथे २४ तासात उभारले नवीन पोलीस मदत केंद्र

## पोलीस उपमहानिरिक्षक संदीप पाटील, पोलीस अधीक्षक नीलोत्पल व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडले उद्घाटन



**गडचिरोली | प्रतिनिधी**

माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्हा, दुर्गम अतिदुर्गम भाग असलेला ज्याठिकाणी बरेच आदिवासी बांधव आज देखील विकासापासून कोसो दूर आहेत. त्यांचा विकास साधावा व माओवाद्यांच्या कारवायांना आळा बसावा, यासाठी गडचिरोली पोलीस दलाने १५ जानेवारी रोजी उपविभाग हेडरी अंतर्गत गर्दैवाडा या ठिकाणी २४ तासात नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली. आगामी काळात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय व निकोप वातावरणात पार पडाव्यात तसेच या भागातील नागरिकांच्या सर्वांगिण सुरक्षा व विकासाला हातभार लागून त्यांनी विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्याकरीता पोलीस मदत केंद्र गर्दैवाडा मैलाचा दगड ठरेल.सदर पोलीस मदत केंद्राची उभारणी करण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. त्यात एकुण १५०० मनुष्यबळ, १० जेसीबी, १० ट्रेलर, ०४ पोकलेन, ४५ ट्रक इत्यादीच्या सहाय्याने अवघ्या एका दिवसांत पोस्ट उभारणी करण्यात आली. पोलीस मदत केंद्रामध्ये पोलीस बलाच्या सुविधेसाठी वायफाय सुविधा, २० पोर्टा कॅबिन, जनरेटर शेड, पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लांट, मोबाईल टॉवर, टॉयलेट सुविधा, पोस्ट सुरक्षेसाठी मॅक वॉल इत्यादींची उभारणी करण्यात येत असून यासोबतच पोलीस मदत केंद्राच्या सुरक्षेसाठी गडचिरोली पोलीस दलाचे ०४ अधिकारी व ५५ अंमलदार, एसआरपीएफ ग्रुप ११, डी कंपणी नवी मुंबईचे ०२ प्लाटुन तसेच सीआरपीएफ १९१ बटा. डी कंपणीचे ०१ असिस्टंट कमांडन्ट व ७५ अंमलदार तैनात करण्यात आले आहेत.तसेच पोमकें उभारणी कार्यक्रमादरम्यान गर्देवाडा येथील उपस्थित नागरिकांपैकी महिलांना सलवार सुट, नववारी साडी, पुरुषांना धोतर, युवकांना लोअर पॅन्ट टि-शर्ट, चप्पल, ब्लॅकेट, चादर, मुलींना सायकल, नोटबुक, फ्रॉक, कंपास, चॉकलेट, बिस्कीट, मुलांना क्रिकेट बॅट, बॉल, व्हॉलीबॉल नेट, व्हॉलीबॉल इत्यादी विविध साहित्यांचे वाटप करण्यात आले. अतीदुर्गम भागात नवीन पोलीस मदत केंद्राच्या उभारणीमुळे तेथील नागरीकांनी संतोष व्यक्त करुन पोलीस प्रशासनाबद्दल सहानुभुती व्यक्त केली. तसेच या भागात गेली कित्येक दशके रस्ते, संपर्क साधने या पासुन वंचीत असलेल्या नागरिकांना १० टॉवर तसेच गट्टा, तोडगट्टा, वांगेतुरी रोड या कामाला तात्काळ सुरुवात करुन ते काम पुर्णत्वास नेण्याचा विश्वास यावेळी पोलीसांनी दिल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हावभाव झळकत होते.सदर नवीन पोलीस मदत केंद्र उभारणीच्या कार्यक्रमास गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरिक्षक संदीप पाटील, केंद्रीय राखीव बल, गडचिरोलीचे पोलीस उपमहानिरिक्षक जगदीश मीणा, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी एम.रमेश, उपविभागीय पोलीस अधिकारी, हेडरी बापुराव दडस व पोलीस मदत केंद्र गर्दैवाडाचे नवनियुक्त प्रभारी अधिकारी सपोनि. बाळासाहेब जाधव, इतर अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

# किष्टापुर (वेल) येथे भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे दिपक आत्राम यांच्या हस्ते उदघाटन

**अहेरी | प्रतिनिधी**

तालुक्यातील किष्टापुर (वेल) येथे जय विर बाबुराव शेडमाके क्रीडा मंडळा कडून आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उदघाटन भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष व माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते करण्यात आला.

या उदघाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून वेलगुर ग्रामपंचायत चे सरपंच किशोर आत्राम तर प्रमुख पाहुणे म्हणून वेलगुर ग्रामपंचायत चे उपसरपंच उमेश मोहूर्ले,किष्टापुर ग्रामपंचायत चे उपसरपंच जीवन आत्राम,पोलीस पाटील महेश अर्का,माजी सरपंच भगवान आत्राम,हरिदास आत्राम, काशिनाथ दब्बा,अनिल दब्बा,मधुकर सडमेक,अजय मडावी,ग्रामपंचायत सदस्य रोहित गलबले,बंडुजी नागोसे,साईनाथ नागोसे,जुलेख शेख,प्रवीण रेषे सह आविस



व बीआरएस चे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माजी आमदार आत्राम यांनी क्रिकेट खेळाविषयी खेडाळु व नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले.टेनिस बॉल क्रिकेट सामन्यासाठी प्रथम पुरस्कार माजी आमदार दिपकदादा आत्राम यांच्याकडून तर द्वितीय पुरस्कार माजी जि.प.सदस्या अनिता दिपक आत्राम तसेच तृतीय पुरस्कार सरपंच किशोर आत्राम व उपसरपंच उमेश मोहूर्ले यांच्या कडून असे एकूण तीन बक्षीस ठेवण्यात आले.जय विर बाबुराव शेडमाके क्रीडा मंडळा कडून आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उदघाटनीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार हरिदास आत्राम यांनी मानले.या टेनिस बॉल सामन्याचे उदघाटनीय सोहळयाला किष्टापुर सह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.सामन्याच्या यशस्वीतेसाठी केतन मडावी,गौतम गावडे,प्रकाश दब्बा,रोहित अर्का,कमलेश अर्का,जीवन आत्राम,भगत आत्राम,अनिकेत सडमेक,यश दब्बा,आदर्श आत्राम,करण दब्बा सह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लोकमान्य महाविद्यालयाचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले

**वरोरा | प्रतिनिधी**

येथील स्थानिक लोकमान्य महाविद्यालयाचे पदवी तथा पदव्युत्तर विभागातील सात विद्यार्थीनी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या अंतर्गत घेण्यात आलेल्या शैक्षणिक सत्र २०२२-२३ च्या गुणवत्ता यादीत प्राविण्य प्राप्त करत स्थान पटकावले आहे. त्यात बी.ए. च्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी कू. वैष्णवी प्रमोद बल्की हिने ८.९३ सि.जी.पी.ए मिळवत दुसरे स्थान प्राप्त केले आहे, तर गणेश महादेव चांभारे याने ८.६७ सि.जी.पी.ए मिळवत गुणवत्ता यादीत दहावे स्थान प्राप्त केले आहे. तसेच कू. वैष्णवी प्रमोद बल्कीने बी.ए.च्या इतिहास अभ्यासक्रमात सर्वाधिक गुण प्राप्त केले आहे. या सोबतच महाविद्यालयाने पदव्युत्तर विभागात विविध विषयात अव्वल स्थान प्राप्त करण्याची परंपरा याही वर्षी जपली आहे. पदव्युत्तर विभागातून राज्यशास्त्र या विषयात कू. कलावती कान्होबा कूत्तरमारे यांनी ९.१९ सि.जी.पी.ए, समाजशास्त्र विषयात कू. श्रुती विजय टोंगे यांनी ९.१९ सि.जी.पी.ए आणि मराठी या विषयात कू.



घ्यार दिपाली यादव यांनी ९.५६ सि.जी.पी.ए मिळवत गुणवत्ता यादीत अव्वल क्रमांक प्राप्त केला आहे. या सोबतच इंग्रजी या विषयातून कु. मेघा दिलीप बावणे यांनी ९.०० सि.जी.पी.ए गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र विषयाच्या महाविद्यालयाच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही विषयाच्या गुणवत्ता यादी अव्वल स्थान पटकावले आहे.महाविद्यालयाच्या या विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशाबद्दल लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळ पाटील, कार्यवाह प्रा. विश्वनाथ जोशी, अँड दुष्यंत देशपांडे व व इतर सन्माननीय पदाधिकारी तसेच लोकमान्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवत्ता यादीत प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# राजकारणातील चाटुगिरी

**राजकारणात सध्या पांडवांपेक्षा कौरवांच्या विचाराचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते. सर्वत्र कौरवांच्या विचारांचा वावर वाढलेला दिसतो. सत्याचा पडाव होताना दिसत आहे. असत्याचा विजय वाढलेला आहे.पांडव म्हणजे सत्याचे प्रतिक. सत्याची पाटराखण करणारे वातावरण दिसत नसले तरी पांडवांनी म्हणजे सत्याने घाबरून जाण्याचे कारण नाही. केव्हा ना केव्हा सत्याचाच विजय होणार आहे. सत्य कधीही मरत नसते. ते उशिरा का होईना योग्यवेळी त्याला न्याय मिळतोच. म्हणतात ना 'सत्यमेव जयते' केव्हा ना केव्हा सत्याची पहाट होईलच. फक्त धीर धरायची गरज आहे.**




राजकारणामध्ये मोठी ताकद असते. राजकारण ही मोठी शक्ती आहे. राजकारणाच्या चाव्या जर आपल्या हातामध्ये असेल तर अनेक प्रकारच्या समस्या क्षणात आटोक्यात येतात. सत्ता हातात असली की सर्वांना कसे झुकवता येते. पाहिजे तसे वाकवता येते, वागवता येते. म्हणून एकदा सत्तेची चटक लागली की अनेकजण तिच्या आहारी जातात. पूर्वी असे नव्हते. पूर्वी सत्ता ही समाजकारणासाठी लोकहितासाठी व तत्व म्हणून स्वीकारली जायची. अलीकडे सत्तेचा वापर स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेला आहे. सत्ता है सब कुछ है अशा अविर्भावात सत्ताधारी वागत असतात. सत्तेचे लोणी चाखत असतात. केवळ एकटेच खात नाही तर कमीतकमी आपल्या समोरील सात पिढ्यांना पुरेल एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये सत्तेच्या माध्यमातून लोण्याची पळवापळवी चाललेली असते. आणि दुर्दैवाने कार्यकर्ते व जनता उघड्या डोळ्यांनी बघत असते. जनता तर बिचारी मुकी, बहिरी. ती काय करणार? एकदा मतदान केले की ५ वर्षे बोलायचे नाही.जर कोणी बोलण्याचा प्रयत्न केला तर ऐकायला कुणाकडे फुरसत आहे. कुणालाही जनतेचे ऐकायला वेळ नाही. कार्यकर्त्यांचे म्हणाल तर कार्यकर्ते साहेबांना लोटांगण घालण्यात मग्न आहेत.इतके अंधभक्त झालेले असतात की त्यांना स्वतःचे असे डोळे उरलेच नाही. स्वतःचे डोळे उरले नसल्याने दिसण्याचा प्रश्नच राहिलेला नाही. म्हणजे अंधभक्त कार्यकर्ते आणि लाचार जनता यांचा गैरफायदा हे राज्यकर्ते घेत आहेत.

पूर्वी राजकारण हा जनसेवेचा मार्ग समजला जात. आता राजकारण हा स्वतःला मोठे करण्याचा मार्ग समजला जातो. कार्यकर्ता, समाज खड्डयात गेला तरी हरकत नाही. आपण तरलो पाहिजे हे नेत्यांची मनोभूमिका झालेली आहे. इतरांची सेवा करताकरता मेवा खातखात स्वतःला इतके मोठे करायचे की मागे फिरून पाहिले असता इतर अतिशय छोटे वाटू लागतील इतकी गडगंज संपत्ती या नेत्यांकडे जमा होते. चहा विकणारा, ट्रॅक्टर चालविणारा, इतरांकडे इतरांकडे गृहकाम करणारा नोकरचाकर, सायकलवर जाणारा एक सामान्य कार्यकर्ता राजकारणामध्ये आला की इतका मोठा कसा होतो याचे रहस्य आम जनतेला कळायला मार्ग नाही. राजकारणामध्ये अशी कोणती ताकद आहे? असे कोणते सोर्सेस आहे? की तिथे पोहचताच नेते गडगंज आणि मालदार होतात. इकडे नोकरदार सतत अहोरात्र अभ्यास करून, मेहनत करून, कष्ट करून परीक्षा देत देत एखादी पात्र परीक्षा पास करतो आणि नोकरीवर लागतो. तरीही महिन्याच्या शेवटी त्याच्याकडे पुरेसे पैसे उरत नाही. मात्र या धन्नाशेट नेत्यांकडे एवढा गडगंज पैसा असतो की तो मोजायलाही कॅल्क्युलेटर कमी पडेल. असं काय शास्त्र आहे की राजकारणामध्ये आल्यानंतर लक्ष्मीची आवक वाढते हे कळायला मार्ग नाही. एखाद्या पगारदाराला आपल्या उत्पन्नाचे सोर्सेस दाखवावे लागतात. जो पगार मिळतो तो इन्कम टॅक्स डिपार्टमेंटला दाखवून त्याची योग्य प्रमाणामध्ये नोंदणी करून उचित आयकर भरावा लागतो. मात्र या नेत्यांकडे पगारदारांपेक्षा हजारो पट संपत्ती आल्यावर त्यांना पाच पैसेही आयकर भरावा लागत नाही. उत्पन्नाचे कुठले सोर्सेस दाखविण्याची आवश्यकता नाही ही गोष्ट मनाला शल्य देणारी आहे. ज्याप्रमाणे नोकरदार प्रामाणिकपणे कष्ट करून आयकर भरून जीवन जगतो. त्याप्रमाणे नेत्यांना आपली उत्पन्नाचे सोर्सेस दाखविण्याची सक्ती का केली जात नाही हा मोठा प्रश्न आहे. नेत्यांचे एखाद्या अजगराप्रमाणे वाढते आर्थिक स्वरूप बघता हे सगळे निकोप लोकशाहीसाठी घातक आहे. गोळा होणारा हा पैसा नेत्यांच्या प्रामाणिक कमाईचा तर नक्कीच नाही.केवळ पांढरेशुभ्र धवल कापड घातले, महागड्या कारमध्ये फिरलो, हातात सोन्याच्या चार अंगठ्या घातल्या व पायात नामांकित कंपनीचा बूट घातला म्हणजे आपण नेते झालो असे नाही. नेत्यांमध्ये वैचारिकता, दूरदृष्टी आणि परिपक्वता पाहिजे. अनेक नेत्यांना ते ज्या प्रकारच्या राजकारणात काम करतात त्या राजकारणातील प्राथमिक माहिती सुद्धा नसते. केवळ भपकेबाज वागून, जाती धर्माच्या नावावर लोकांना पेटवून, आराधुरा न बघता भाषणे ठोकत आपल्या खेड्यात खेड्याकडील भाषेत बोलायचे तर गुंडगिरी करून हे लोक आपली बस्ताने मांडत असतात. दादागिरीच्या भरोशावर, भाडोत्री गुंडांच्या भरोशावर राजकारण करत असतात. (अर्थात यात काही प्रामाणिक लोकही आहे. पण ते तुलनेने अतिशय कमी आहे.) हे कुठेतरी थांबले पाहिजे. देशाच्या उज्वल भवितव्यासाठी हे सगळे घातक आहे. पूर्वीचे राजकीय नेते मोठ्या पदावर राहिल्यानंतर सुद्धा त्यांना स्वतःला राहायला चार खोल्यांचे घर बांधता येत नव्हते. आताचा साधा गावपातळीवरील लोकसेवक पाच वर्षांत आलीशान बंगला उभा करतो. त्यांच्या ढुंगणाखाली महागड्या गाड्या येतात कुठून? हा पैसा येतो कुठून? एकेकाळी दोन टाईमचे खाण्याचे फाके असलेला लोकप्रतिनिधी बनताच पाच वर्षात लिनान कपड्यांवर येऊन एखाद्या राजेशाही थाटात वागतो. त्याच्या या यशाचे रहस्य काय आहे? गुपित काय आहे? हे मात्र सामान्य जनतेला कळत नाही. म्हणून कार्यकर्त्यांनी नेत्यांची निवड करताना, आपला नेता कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. निव्वळ भाऊ , दादा, साहेब करत त्याच्याशी सख्य करण्याचे बंद केले पाहिजे. मी प्रमाणिक माणसाच्या मागे उभा राहील ही भूमिका घेऊन जर काम केले तर चांगल्या आचाराची चांगल्या विचाराची माणसे राजकारणामध्ये निवडून येईल. चांगली सत्वशील माणसे जर निवडून आली तरच लोकशाही वाचेल. कुठल्याही उपटसुंभ माणसाच्या हातात लोकप्रतिनिधी म्हणून सूत्र गेल्यास लोकशाहीला निश्चितच धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. कारण लेखाच्या सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे राजकारण अशी चावी आहे की, या चावीच्या माध्यमातून आपण आपल्या उद्धाराच्या अनेक प्रकारच्या दिशा उघडू शकतो. आपली पुढील पिढी आणि त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवायचे असेल तर सत्तेमध्ये चांगल्या विचारांची माणसं बसायला हवीत याची काळजी घेतली पाहिजे.

आता प्रश्न उरला सामान्य जनतेचा. सामान्य जनतेला वाटतं की, आपण एकदा लोकप्रतिनिधी निवडून दिला आणि जर तो नालायक निघाला तर आपण काय करणार? ५ वर्षे त्याला झेलल्याशिवाय दुसरा मार्ग नाही.अलिकडे नेतेच असे वागत आहे की, कार्यकर्ता म्हणून वावरायचे एकीकडे? निवडणुकीत उभे राहायचे दुसरीकडे. निवडून आल्यावर पाठिंबा द्यायचा तिसरीकडे. समोरच्या निवडणुकीपर्यंत निघून जायचे चौथीकडे. सगळं हे अनैसर्गिक काम सुरू आहे. अलीकडे लोकांना पक्षांतर करण्यासाठी कुठल्याही प्रकारची लाज वाटत नाही. शरम वाटत नाही. लोक सरसकट या पक्षातून त्या पक्षामध्ये बेडूक उड्या मारतात आणि वरून तत्वाच्या गोष्टी सांगतात. खरं म्हणजे अशा लोकांना तत्व सांगण्याची काही नैतिकता उरली नाही. अशा पक्षबदलु तत्वहीनांना फार गांभीर्याने घेण्याची सामान्य लोकांना गरज नाही. सामान्य जनता ही एखाद्या न्यायाधीशाप्रमाणे असते. ज्याप्रमाणे न्यायाधीश आपल्या समोरील दोन्ही बाजूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो आणि त्याला जो पटेल तो न्याय देतो. तसे सामान्य जनतेचे सुद्धा आहे. सामान्य जनता बोलत नसली, आपली प्रतिक्रिया व्यक्त करत नसली तरी मात्र राजकारणात काय चालले आहे हे जनतेला कळते. ती मुकी, बहिरी असल्याचा भाव दिसत असला तरी ती खऱ्या अर्थाने मुकी किंवा बहिरी नसते. तर ती सत्वशील असते.

सत्वशील माणसे ही कोणत्याही प्रकारचा देखावा करत नाही. चाटुगिरी करत नाही. ती आपल्या तत्त्वांशी बांधलेली असतात. आपल्या विचारांशी बांधलेली असतात. त्यांच्या हृदयात विचाराचा जो दिवा तेवत ठेवलेला असतो तो कसा तेवत राहील याची ते काळजी घेत असतात. वारंवार बोलणे, आक्रोश करणे, मोठा आवाज करणे, आपल्याकडे इतरांचे लक्ष केंद्रित करणे, आपण नाही त्यातले हे दाखविणे, हे चाटू लोकांचे काम आहे. प्रामाणिक माणसाला मी प्रामाणिक आहे हे सांगण्याची गरज नाही. त्याप्रमाणे मतदार हे जरी बोलत नसेल. कुठल्या प्रकारच्या प्रतिक्रिया देत नसेल तरी ते आपल्या समोरील लोकांचे योग्यप्रकारे मूल्यमापन करीत असतात. योग्यवेळी त्याचे ते मूल्यमापन कोणाला कोणत्या जागेवर बसवायचे हे ठरवतात.

# डॉ.अनिल भिकाने यांना कर्तृत्व गौरव २०२४ पुरस्कार प्रदान

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठाचे विस्तार शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल उद्धवराव भिकाने यांना नुकतेच मुंबई येथे व्हेटरनरी प्रक्टिशनर्स वेलफेअर असोसिएशन मुंबई तर्फे 'कर्तृत्व गौरव २०२४' हा मानाचा पुरस्कार देवून गौरवण्यात आले आहे . सदरील पुरस्कार नवी मुंबई येथे एका शानदार सोहळयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांचे हस्ते तर प्रसिद्ध कलाकार डॉ. नितिश भारद्वाज, असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. राहूल मुळेकर व सचिव डॉ. रोहित गायकवाड यांचे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. भिकाने यांनी उदगीर, अकोला व नागपूर येथे केलेल्या ३५ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेत सातत्यपूर्ण उल्लेखनिय विस्तार कार्याबद्दल देण्यात आला.



डॉ. भिकाने यांनी उदगीर येथील कार्यकाळात चिकित्सालयाच्या माध्यमातून गरजू शेतकऱ्याना अहोरात्र सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. चारशेहून अधिक खेड्यात भव्य शेतकरी मेळावे व पशुरोग निदान शिबिराचे आयोजन करून पशुपालकांना तज्ञांची सेवा उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे डॉ. भिकाने यानी प्रयोगशाळेच्या चार भिंतिंत न अडकता प्रत्यक्ष शेतकर्यांच्या गोठ्यावर जावून अनेक तरुणाना प्रोत्साहित करून दुध व शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून स्वंयरोजगारासाठी प्रवृत्त केले आहे. मराठवाड्यात दुष्काळी परिस्थितीत ३७ चारा छावण्याना भेटी देवून १४५ शेतकरी जागरूकता कार्यक्रमाद्वारे प्रबोधन केले. कोवीडच्या प्रतिकूल काळात अकोला येथे सहयोगी अधिष्ठाता म्हणून कार्यरत असताना ११५ दिवसाचे ४२ ऑनलाईन आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय व राज्यस्तरीय कार्यक्रमातून बारा हजाराहून अधिक पशुवैद्यक व पशुपालकाना प्रशिक्षित करण्याचे कार्य केले.नागपूर येथे विस्तार संचालक पदावर कार्यरत असताना लंपी चर्मरोग साथीत रोगोपचार तसेच नियंत्रण कार्यात राज्य टास्क फोर्सचे मेंबर म्हणून मोलाचे योगदान दिले आहे. तर विद्यापीठ परिसरात सुरेख म्युजियम साकारले आहे. सध्या ते 'किसान से किसान तक' हा अभिनव उपक्रम राबवत आहेत. ते महाराष्ट्रभर मराठीतील लेख, रेडिओ व दुरदर्शन वरिल मुलाखती तसेच प्रशिक्षण व शेतकरी मेळाव्यातून प्रबोधन करत आहेत. त्यानी लिहलेली इंग्रजी-मराठी पुस्तके देशभर पशुवैद्यकात व राज्यात शेतकर्यात लोकप्रिय आहेत. त्याना राष्ट्रीय स्तरावरील तिन सुवर्णपदकासह माफसूचे आदर्श प्राध्यापक, सर्वोत्कृष्ट संशोधक व विस्तार कार्यकर्ता असे तिन्ही बहुमान मिळाले आहेत. सदरील पुरस्कार प्राप्त झाले बद्दल माफसुचे कुलगुरु डॉ नितिन पाटील, माजी कुलगुरू डॉ ए टी शेरीकर, माजी कुलगुरू डॉ आशीश पातुरकर, अधिष्ठाता डॉ शिरीष उपाध्ये, संशोधन संचालक डॉ नितिन कुरकुरे, डॉ शैलेंद्र रेड्डी व माफसू कास्टट्राइब संघटनेचे उपाध्यक्ष प्रविण बागडे यांचेसह प्राध्यापक, विद्यार्थी पशुवैद्यक आदीनी त्यांचे अभिनंदन केले.

# समाजातील युवकांनी क्रीडा क्षेत्रात आपली प्रगती करावी- राजे अम्ब्रिशराव आत्राम

## तूंमुरगुंडा येथे भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील चुटुगुंटा ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या तूंमुरगुंडा येथे 'न्यु यंग स्टार क्रीडा मंडल' यांच्या सौजन्याने भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटक म्हणून माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे होते.उद्घाटक म्हणून संबोधित करताना ते म्हणाले,आपल्या आदिवासी समाजातील युवकांनी क्रीडा स्पर्धेत पुढे आलं पाहिजे व आपले कर्तृत्व सिद्ध केलं पाहिजे,समाजातील प्रत्येक युवक प्रगती करेल तेव्हा आपला समाज प्रगती करणार,आणि समाजातील युवकांनी क्रीडा क्षेत्रात आपली प्रगती करावी असे राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून समाजातील युवकांना आव्हान यावेळी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी केले.कार्यक्रमाचे सहउद्घाटक म्हणून चुटुगुंटा सरपंच कु.साधना मडावी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे,प्रमुख अतिथी म्हणून माजी उपसभापती बासू मुजुमदार,सामाजिक कार्यकर्ते संतोष उरेते,भाजपा तालुका अध्यक्ष संजीव सरकार,भाजप महामंत्री विजय



बिश्वास,कडते सर,कुणघडकर साहेब,परदेशी मडावी,गिरमा सडमेक,बाबुराव वेलादि,सुभाष कुसनाके,देवाजी कोडापे,वैष्णव ठाकूर,दिलीप शेडमाके,कु.अरुणा वेलादि हे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी मोठ्या संख्येने स्पर्धकांनी भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेला हजेरी लावली होती.

भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी प्रथम पुरस्कार ३१ हजार एक रुपये पुरस्कार माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून तर द्वितीय पुरस्कार २१ हजार एक रुपये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे यांच्या तर्फे देण्यात आले आणि तृतीय पुरस्कार ११ हजार एक रुपये माजी समाजकल्याण सभापती सौ.माधुरीताई संतोष उरेते यांच्या कडून देण्यात आले आहे.यावेळी महिला वर्ग गावातील युवक,युवती आणि तूंमुरगुंडा येथील ग्रामस्थ मोठ्या उत्साहात उपस्थित होते..!

# पुलगाव गजानन मंदिरात जागतिक पारायण



**पुलगाव । प्रतिनिधी**

जागतिक स्तरावर जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या रविवारी श्री. गजानन विजय ग्रंथाचे सामुहिक पारायण केले जाते. स्थानिय गजानन महाराज मंदिरामध्ये दि.१४ ला जागतिक पारायण दिन साजरा करण्यात आला.

अमरावती येथील कथावाचक सो अस्मितातार्ई केवले या मुख्यवाचक म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या रसाळ व भावपूर्ण वाचनाने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. सामूहिक पारायणासाठी मोठ्या प्रमाणावर भक्तगण मंदिरामध्ये एकत्र आले होते. महाराजांच्या मूर्तीचे पूजन, आरती झाल्यानंतर मंदिराचे अध्यक्ष मनोज देशमुख यांनी श्री गजानन विजय ग्रंथाचे पूजन केले.कमल जगताप यांना कथावाचक अस्मितातार्ई केवले यांचे स्वागत केले. श्री गजानन अष्टक पठणानंतर पारायण प्रारंभ झाले.७ व १४ व्या अध्यायानंतर फराळ व चहा वितरित करण्यात आला.२१व्या अध्यायानंतर आरती व प्रसाद वितरण करण्यात आले. महाप्रसादानंतर समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व गजानन भक्तांनी परिश्रम घेतले..

# अजय कंकडालवार यांच्या हस्ते टेकडातल्ला येथील भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन

**सिरोंचा । प्रतिनिधी**

तालुक्यातील टेकडातल्ला येथील विश्वात्मा क्रिकेट क्लब टेकडातल्ला येथील भव्य टेनिस बॅल क्रिकेट स्पर्धेचे आयोजित केली आहे.या सदर क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन आविसं - काँग्रेस नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

या क्रिकेट कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक हनमंनू जी.मडावी होते.सहउदघाटक म्हणून आविसं तालुका अध्यक्ष बानय्या जनगाम आणि काँग्रेस तालुका अध्यक्ष सतीश जावजी होते.प्रमुख पाहुणे म्हणून जाफ्राबाद ग्रामपंचायतचे सरपंच निर्मला कुळमेथे आणि महिला काँग्रेस उपअध्यक्ष नीता तलांडे होते.तर या क्रिकेट स्पर्धेसाठी माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या कडून प्रथम पारितोषिक देण्यात येत आहे.तर द्वितीय पारितोषिक बानय्या जनगाम -



काँग्रेस तालुका अध्यक्ष व सतीश जवाजी यांच्या कडून देण्यात येत असून,तृतीय पारीतोषिक माजी उपसरपंच तिरुपती दुर्गम-ग्रामपंचायत सदस्य व तिरुमाला दुर्गम यांच्या कडून देण्यात येत आहे.यावेळी सर्व प्रथम अजय कंकडालवार यांनी गौतम बुद्ध आणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.यावेळी माजी जि.प.अध्यक्ष कंकडालवार यांचा गावात आगमन होताच गावकऱ्यांनी त्यांचा विविध नूत्य करत ढोल तशाने जंगी स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित आविसंचे जेष्ठ नेते शंकर मंदा,आविसं नेते मल्लिकार्जुन आकुला,सिरोंचा तालुका अध्यक्ष बानय्या जनगाम,महिला उपाध्यक्ष नीताताई तलांडे,रामूलू कुळमेथे,बीचमाय्या कुळमेथे,सरपंच निर्मला कुळमेथे,माजी सभापती भास्कर तलांडे,माजी जि.प.सदस्य अजय नैताम,विद्यमान सदस्य गुलाबराव सोयाम,सरपंच दिलीप मडावी,वेलगुर ग्रामपंचायतचे माजी सरपंच अशोक येलमुले,मारपाल्ली ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच कार्तिक तोगम,नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,माजी उपसरपंच तिरुपती दुर्गम,ग्रामपंचायत सदस्य महेश दुर्गम,मारोती गणपूरवार,सरपंच तथा सिरोंचा बाजार समिती संचालक अजय आत्राम,लक्ष्मण बोल्ले,साई मंदा,श्रीनू गोडाम,माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या सोशल मीडिया समन्वयक संपत गोगूला,जेनु अंबाला,संतोष कोयला,संतोष अडुरी,राजशेखर दुर्गम,महेश दुर्गम,आनंदराव आशा, किशोर चिटच्याला,कैलाश कोयला,सडवली दुर्गम,स्वप्नील मडावी,शिवराम पुल्लूरी,नरेश गर्गम,प्रमोद गोडसेलवार,अशोक चिपेल्लीसह परिसरातील आविसं - काँग्रेसचे पदाधिकारी तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पी.एम.जनमन अभियानाच्या माध्यमातून आदीम कोलाम जमातीच्या लाभार्थ्यांना मिळाला लाभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या औचित्याने देशातील आदीम जमातीच्या विकासाकरिता पी.एम.जनमन या योजनेची सुरुवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आलीआहे.यानिमित्तबालाजी सेलिब्रेशन हॉल, गडचांदूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे देशातील आदीम कोलाम जमातीच्या नागरिकांशी संवाद साधला.कार्यक्रमाला आमदार सुभाष धोटे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम., उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुभाष पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मीना साळुंखे, राजुराचे उपविभागीय अधिकारी रवींद्र माने, कोरपण्याचे तहसीलदार रणजीत यादव, चिमूरचे प्रकल्प अधिकारी प्रवीण लाटकर, नागपूर, सार्वजनिक आरोग्य संस्थेचे संचालक डॉ. पुरुषोत्तम मडावी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, आदिवासी सेवक राघोजी गेडाम, बंडू गेडाम यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे म्हणाले, क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे औचित्य साधून १५ नोव्हेंबर २०२३ पासून या योजनांची अंमलबजावणी सुरू झाली. मात्र, या योजनेची व्यापक अंमलबजावणी करतांना अडचणी नक्कीच येतात. शबरी आदिवासी घरकुल योजनेत रु.१ लक्ष २० वरून पी. एम. जनमन योजनेत



२ लक्ष ५० हजार रुपये देण्यात येत आहे. या भागातील कोलाम बांधव वनावर प्रेम करतात, त्यामुळेच येथील वन टिकून आहे. त्यासोबतच कोलाम समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार देण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून प्राधान्याने व्हावा, असेही ते म्हणाले.उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू म्हणाल्या, कोलाम जमातीच्या विकासाकरीता प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम. यांच्या मार्गदर्शनात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने व अन्य विभागाच्या सहकार्याने ३ जानेवारीपासून विविध शिबिरांच्या माध्यमातून व कोलाम नागरिकांच्या घरापर्यंत जाऊन योजनेचा लाभ दिला. प्रास्ताविकेत बोलतांना सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम. म्हणाले, कोरपना, राजुरा, वरोरा व जिवती या तालुक्यात ८ हजारच्या वर आदीम कोलाम जमातीचे वास्तव्य आहे. येथील आदीम कोलाम जमातीच्या नागरिकांना आधारकार्ड, घरकुल योजना, जात प्रमाणपत्र, बँक खाते, किसान क्रेडिट कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, उत्पन्न दाखला, अधिवास प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजना तसेच आरोग्य तपासणी अशा विविध सुविधा व दाखले देण्यात येत आहे. आजपर्यंत एकूण ८ हजार ९३४ विविध दाखले काढण्यातआल्याचेहीते म्हणाले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदीयांचालाभार्थ्यांशी संवाद:यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील छत्तीसगड राज्यातील जशपूर, मध्यप्रदेश राज्यातील शिवपुरी, महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, आंध्रप्रदेश तसेच झारखंड राज्यातील जुमला येथील आदिम जमातीच्या लाभार्थ्यांची संवाद साधला.विविध योजनांची दालने:सदर कार्यक्रमात प्रधानमंत्री उज्वला योजना, आयुष्मान कार्ड, आधार कार्ड, आरोग्य विभागामार्फत क्षयरोग, हिवताप, हत्तीरोग, सिकलसेल, मलेरिया आणि कुष्ठरोग, मोफत आरोग्य तपासणी आदी दालने उभारण्यात आली होती.प्रमाणपत्रांचे वितरण:राजुरा, जिवती, कोरपना व वरोरा तालुक्यातील आदिम कोलाम जमातीच्या नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राजुरा तालुक्यातील सुरेश आत्राम, मेघू आत्राम, तुकाराम कुमरे, तसेच जिवती तालुक्यातील मारूबाई कोडापे, अनुबाई मडावी, आयुष आत्राम या लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेत मोतीराम मडावी, कमलबाई आत्राम, कनू मडावी, पग्गुबाई मडावी तर वनहक्क पट्टे वितरणात रामा सिडाम, भीमबाई कोडापे, लक्ष्मण मडावी आदी कोलाम जमातीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.घरकुलाचे वाटप:जिवती तालुक्यातील मोतीराम मडावी, माणिकराव मडावी, नामदेव कोडापे यांना घरकुल प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.आयुष्मान भारत कार्डचे वितरण :कोरपनातालुक्यातील विनोद टेकाम, बाळू टेकाम, शंकर सिडाम, देवराव मडावी या लाभार्थींना आयुष्यमान भारत कार्डचे वितरण करण्यात आले. तर वरोरा तालुक्यातील जयंता टेकाम, मंदा टेकाम,राजकुमार रामगडे, प्रेमीला आत्राम या लाभार्थींना नव्याने आधारकार्डचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. न्यूक्लिअस बजेट अंतर्गत साहित्याचे वितरण:जिवती तालुक्यातील आदिम कोलाम कृषी किसान पुरुष बचत गटास न्यूक्लिअस बजेट अंतर्गत ट्रॅक्टर व ट्रॉली तर श्यामदादा महिला स्वयंसहायता समूह बचत गटास मालवाहक चारचाकी वाहनाचे वितरण करण्यात आले.

# सेंट जॉन हायस्कूलमध्ये जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय यशशोध ज्ञानप्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व ज्यू. कॉलेज येथे जिल्हा- स्तरीय वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचा विषय वय वर्ष १६ मतदानासाठी योग्य की अयोग्य यांत इयत्ता नववी ते बारावीपर्यतच्या विदयार्थांचा समावेश होता, प्रत्येक शाळेतील एकूण दोन विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली होती.कार्यक्रमाला प्रामुख्याने शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे ,मंगेश जगताप ,प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती करझडकर ,उपप्राचार्य महेंद्र भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहूणे म्हणून वर्धा नागरी सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष केशवराव दांडेकर ,पुलगाव आणि डॉ.नितिन गौरखेडे ,रोहना यांना आमंत्रित करण्यात आले होते. स्पर्धेचे परिक्षण करण्याचा माण्याची केशवराव दांडेकर आणि प्रा. डॉ.नितीन गौरखेडे यांना मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने आणि दिपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रथम पुरस्कार सेंट जॉन हायस्कूल पुलगावची कु गर्विता मिश्रा ला ५००१ रुपये, द्वितिय पुरस्कार -रुपये ३००१ भवन लॉएड्स वर्धा हायस्कूलची जानवी वानखेडे ला देण्यात आले. तसेच तृत्तिय पुरस्कार रुपये २००१ इंडियन मिलिटरी चा विदयार्थी हिमांशू निकुरे ला देण्यात आलेप्रथम प्रोत्साहनपर बक्षीस शहरी भागातून सेंट जॉन हायस्कूल पुलगावचा विद्यार्थी सक्षम बीरे ला, द्वितिय प्रोत्साहनपर बक्षीस गांधी सिटी पब्लिक स्कूल पूलगावची विदयार्थी कु. स्नेहा आझमी ला तर तिसरे प्रोत्साहनपर बक्षीस आर .के. स्कूल पुलगावची विदयार्थी कु.याशिका खोरिया हीला मिळाले ग्रामिण भागातून प्रथम प्रोत्साहनपर बक्षीस मॉडेल हायस्कूल रोहण्याची कु. वेदिका पाचारे ला, द्वितिय प्रोत्साहनपर बक्षिस यशवंत हायस्कूल - विजय गोपालची विद्यार्थी कु. रेनुका चौके हीला प्राप्त झाले तर तृतिय प्रोत्साहनपर बक्षीस मॉडेल हायस्कूल सोरटाची विद्यार्थी कु जुही आपुरकर हीला प्राप्त झाले.यावर्षी फिरत्या चषकाचे विजेतेपद भवन लॉएड्स हायस्कूल वर्धा ला प्राप्त झाले.कार्यक्रमाचे संचालन विधीउमक आणि शौर्य ठाकूर ने केले तर आभार प्रदर्शन कु. पूर्वा डहाके ने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# मकर संक्रांतीच्या पर्वावर प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महा अभियानाचा शुभारंभ

## आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधानांचे विशेष प्रयत्न- खा.नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

मकर संक्रांतीच्या पर्वावर दि.१५ ला प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाचा शुभारंभ गडचिरोली तालुक्यातील पोटेगांव येथे करण्यात आला. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना रस्ते, पाणी, आरोग्य, दूरसंचार, वीज आणि घरे यासारख्या मूलभूत गरजा पुरविण्यासाठी आणि आदिवासी समुदायात विकासाबाबत जागरूकता आणण्यासाठी सरकार अनेक प्रयत्न करत आहेत. परंतू अजूनही जे वंचित आहेत त्यांच्यापर्यंत योजना पोहोचवण्यासाठी आणि आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान मोदी विशेष प्रयत्न करत आहेत. त्यासाठीच प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान (पीएम जनमन) राबविले जाणार असल्याचे यावेळी खासदार तथा



भाजपच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते म्हणाले. खासदार नेते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आदिवासी नागरिकांना त्यांच्यासाठी सरकार राबवत असलेल्या योजनांची माहिती देऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला.एकाचवेळी देशातील विविध ठिकाणच्या आदिवासी भागात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गडचिरोली जिल्ह्यात हा कार्यक्रम पोटेगांव येथे घेण्यात आला. यावेळी प्रामुख्याने आ.डॉ.देवराव होळी, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, सहायक जिल्हाधिकारी राहुल मिना, अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दावल साळवे, प्रादेशिक अधिकारी राम वर्मा, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सोळंकी, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक प्रशांत तिडके, तहसीलदार महेंद्र गणवीर, पोटेगांवच्या सरपंच अर्चना सुरपाम, सावेलाच्या सरपंच सुरेखा मडावी, राजोलीच्या सरपंच कांता हलामी, माजी पं.स. सदस्य मालता मडावी, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.यावेळी आदिवासींच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या दूरदर्शी उपक्रमांची माहिती देण्यात आली. विविध लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधानांनी अनेक ठिकाणच्या नागरिकांशी लाईव्ह संवादही साधला.

# वरोरा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

स्थानिक सुभाष वार्डातील संजीवनी महिला गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने नुकताच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५५ वा पुण्यस्मरण सोहळा दिनांक प५ ते ७ जानेवारी दरम्यान साजरा करण्यात आला. या सोहळ्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरूकुंज आश्रमाचे सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे हभप प्रकाश महाराज वाघ, राष्ट्रीय कीर्तनकार हभप सुशील महाराज वनवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उत्सवात स्त्री पुरुष व महिलांसाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आध्यात्मिक व सामाजिक तथा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाच्या अध्यक्ष चंद्रकला नरेंद्र मत्ते, उपाध्यक्ष ललिता बोथले, सचिव रजनी बरबटकर, कोषाध्यक्ष शोभा देवगडे तथा अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# आ.किशोर जोरगेवार यांच्या हस्ते मतदार संघातील ११ कोटी१३ लक्ष रुपयांच्या ५१ कामाचे भुमिपूजन

## ग्रामीण भागात उपलब्ध होणार मुलभुत सोयी सुविधा,८ कोटी रुपयातून होणार पांदन रस्ते

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नाने११कोटी १३लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ग्रामविकास २५ड़१५ निधीतून मंजूर या निधीतून मतदार संघातील५१कामे करण्यात येणार आहे. यात जवळपास ८ कोटी रुपये पांदन रस्त्यासाठी खर्च केल्या जाणार आहे. या सर्व कामांचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर,ग्रामीण कामगार आघाडी यंग चांदा ब्रिगेडचे,रुपेश झाडे,चिंचाळा च्या सरपंचा शोभा चिमुरकर,ग्रामविकास अधिकारी सुधाकर वासेकर,खुटाळा सरपंच ऋतिका नरुले,उपसरपंच रोशन रामटेके,वेंडली सरपंचा प्रतिमा अलवलवार,उपसरपंच राजकुमार नागपुरे,पडोली सरपंच विक्की लाडसे,दाताळा सरपंच सुनीता देशकर,मोरवा सरपंच स्नेहा साव,उपसरपंच भूषण पिदुरकर,म्हातारदेवी सरपंच संध्या पाटील,उपसरपंच शंकर उईके,पिपरी सरपंच वैशाली मातने,उपसरपंच हरिओम पटवले,सोनेगाव सरपंच संजीव उकीनकर,शेणगाव सरपंच सुष्मा मालेकर,ग्रामीण संघटक मुन्ना जोगी,छोटा नागपूर उपसरपंच ऋषभ दुपारे,गुड्डू सिंग,दाताळा माजी सरपंच रवी लोनगाडगे,साखरवाही सरपंच नागेश बोंडे,दिलीप चौधरी,अनिल नरुले,श्यामकांत थेरे,जय मिश्राशहर संघटक विश्वजीत शहा,राशेद हुसेन,कार्तिक बुरेवार,कौरव जोरगेवारआदींची उपस्थिती होती.या कार्यक्रमात बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले कि,मतदार संघाच्या विकासकामांसाठी आपण निधी कमी पडू दिलेला नाही. शक्य त्या सर्व विभागातून आपण मोठा निधी






या भागाच्या विकासासाठी उपलब्ध करुन दिला आहे. नुकतेच ग्रामीण भागातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटावा याकरिता आपण१४कोटी रुपये मंजुर करुन आनले आहे. या निधीतुन१०गेटेड बंधारे तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे शेकडो हेक्टर शेतीचा प्रश्न सुटणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.मतदार संघातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी आपण वेळोवेळी मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. मात्र या गावांच्या सर्व समावेशक विकासासाठी मोठ्या निधीची गरज होती. यासाठी आपल्याला११कोटी१३ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करता आला आहे. या निधीतुन मतदार संघातील१०गावातील५१कामे आपण मार्गी काढले आहे. यात पांदन रस्ते, समाज भवन, व्यायामशाळा, रस्ता,नाली,सौदर्यीकरण यासह मुलभुत सोयी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. शहराचा विकास गतीने होत असतांना मतदार संघातील ग्रामीण भाग दुर्लक्षीत राहू नये हा उदिष्ट आमचा राहिला आहे. याकरिता समान वाटप आपण केले आहे. गावात वाचनालय,समाज भवन उपलब्ध करुन देण्याच्या दिशेनेही आमचे प्रयत्न सुरु आहे. काही गावांमध्ये यासाठी आपण निधीही उपलब्ध करुन दिला असल्याचे ते यावेळी म्हणाले.ग्राम विकास निधी २५ड़१५ अंतर्गत मंजूर निधीतून दाताळा येथे१करोड३१लक्ष रुपयांतून५विकासकामे केल्या जाणार आहे,नागाळा,चिंचाळा मार्गासाठी२०लक्ष रुपये,नागाळा येथे समाज भवणासाठी२५लक्ष रुपये,नागाळा - वांढरी ते मोरवा पर्यंतच्या पांदण रस्त्यासाठी३०लक्ष रुपये,नागाळा येथील पांदण रस्त्यासाठी११लक्ष रुपये,वांढरी नागाळा या पांदण रस्त्यासाठी २८लक्ष रुपये,चिंचाळा येथील गुरुदेव सेवा मंडळाच्या सुरक्षाभिंतीसाठी२०लक्ष रुपये,चिंचाळा येथील सिमेंट रोडच्या कामासाठी३०लक्ष रुपये,खुटाळा येथील तुकडोजी महाराज यांच्या सभागृहासाठी४०लक्ष,खुटाळा येथील सामाजिक भवनाच्या कामासाठी२५लक्ष,मोरवा - चारगाव पांदण रस्त्यासाठी३०लक्ष,मोरवा येथील समाज भवनासाठी३०लक्ष,म्हातारदेवी येथील खडीकरणाच्या कामासाठी३०लक्ष,म्हातारदेवी येथील सामाजिक भवनासाठी४१लक्ष,पिपरी येथील समाज भवनाच्या कामासाठी३०लक्ष रुपये,पिपरी - मारडा पांदण रस्त्याच्या खडीकरणासाठी३०लक्ष रुपये,वेंडली येथील पांदण रस्त्यासाठी३०लक्ष रुपये,सोनेगाव येथील पांदण रस्त्यासाठी३०लक्ष रुपये,सोनेगाव अंतर्ला येथील पांदण रस्त्सासाठी२८लक्ष रुपये,सोनेगाव येथील व्यायाम शाळेसाठी२०लक्ष रुपये,शेणगाव ते साखरवाही पांदण रस्तासाठी२८लक्ष रुपये,शेणगाव येथील समाज भवनाच्या कामासाठी४५लक्ष रुपये असा निधी मंजुर करण्यात आला आहे. यासह ईतर कामेही११कोटी रुपयांच्या निधीतुन केल्या जाणार आहे. इंदिरानगर येथील लोहार समाजाच्या समाज भवनासाठी २५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून सदर कामाचेही यावेळी भूमिपूजन झाले या सर्व कामांच्या भुमिपूजन कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अयोध्येत रामलला मूर्ती प्रतिष्ठापनेच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूरात अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन

## अभिनेता पुनित इस्सर यांचे रामायण महानाट्य तर महिला तबला वादक अनुराधा पाल यांचा लाइव्ह इन कन्सर्ट

## हजारो पणत्यांची आरास करुन रामभक्त बनविणार एक भव्य विक्रमी वाक्य ;पालकमंत्री ना.मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात जय्यत तयारी सुरु

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्रीरामजन्मभूमी स्थळी उभारलेल्या भव्य दिव्य मंदिरात श्री रामललाच्या मूर्ती प्रतिष्ठापनेसाठी पवित्र अयोध्या नगरी सज्ज झाली आहे. संपूर्ण विश्व या ऐतिहासिक क्षणाची वाट बघत असताना चंद्रपूर शहर आणि जिल्हादेखील तयारीला लागला असून २० ते २२ जानेवारी २०२४ या तीन दिवसांत भरगच्च आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे चंद्रपूरकर रामभक्त नागरिक प्रभू श्रीरामाची आराधना करणार आहेत; विशेष म्हणजे यानिमित्त २० जानेवारी रोजी एक मोठा विश्वविक्रम चंद्रपुरात नोंदविला जाणार असून गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये याची नोंद होण्याची शक्यता आहे. यासाठी राज्याचे वन सांस्कृतिक कार्य व मत्स्यपालन मंत्री व पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमांची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

घनदाट आणि वैभवशाली वनसंपदा, सर्वाधिक वाघ आणि विपुल खनिज संपत्ती असलेला चंद्रपूर जिल्हा सतत स्वतःचे वेगळेपण जोपासून आहे; श्रीराम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या कोट्यवधी कारसेवकांच्या व रामभक्तांच्या स्वप्नातील भव्य राम मंदिराशी चंद्रपूरचे भावनिक नाते जोडले गेले आहे. या मंदिराच्या गर्भगृहाकरीता लागलेले काष्ठ (सागवान) चंद्रपूर-गडचिरोली च्या वन क्षेत्रातून गेले आहे. २९ मार्च २०२३ रोजी सुमारे ३००० क्यूबिक फूट काष्ठ भव्य शोभायात्रेसह अयोध्येकडे रवाना झाले; यासाठी चंद्रपूरची जनता खरंच भाग्यवान आहे, याच पार्श्वभूमीवर राममूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यापूर्वी आम्ही काही तरी आगळी वेगळी व विक्रमी सेवा देण्याचा संकल्प केला असून चांदा क्लब ग्राउंड यासाठी सज्ज करण्यात येत असल्याची माहीती पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.ना.सुधीर मुनगंटीवार म्हणाले कि, २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत श्री राम जन्मभूमीवर साकार झालेल्या भव्य राममंदिरात श्री रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा संपन्न होताना प्रभू श्रीरामाची ही महापूजा संपूर्ण जग बघणार आहे ; याच निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्याला सुद्धा जगाच्या नकाशावर मानाचे स्थान मिळवून देण्याचा आपला प्रयत्न आहे.दिवाळी उत्सवात आपण ज्या मातीच्या पणत्यांनी घरदारं उजळून टाकतो, त्याचं हजारो पणत्यांनी, चंद्रपूरमध्ये चांदा क्लब ग्राउंडवर हजारो रामभक्त नागरिक एकत्र येऊन जगातले सर्वात मोठे वाक्य तयार करणार आहेत. रामभक्तांच्या साक्षीने रामरायाची अयोध्येत प्रतिष्ठापना होणार आहे; तो सुवर्णक्षण अगोदरपासूनच वाजतगाजत साजरा करण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो रामभक्त २० जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता चांदा मैदानावर शिस्तबद्ध रीतीने अंथरलेल्या हजारो पणत्यांच्या सहाय्याने सियावर रामचंद्र की जय हा अकरा अक्षरी मंत्र लिहिणार आहेत; हजारो पणत्यांनी सजवलेले हे भव्यदिव्य रामनाम आकाशातून अविस्मरणीय दिसणार आहे.चंद्रपूर येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालयाने या आगळ्या वेगळ्या उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. या अतिविशाल उपक्रमाची गिनीस वर्ल्ड रेकॉर्ड्सने नोंद घ्यावी अशी




तयारी सुरू आहे.गिनिसने हा ऑफिशियल अटेम्प्ट करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे या उपक्रमाचे परीक्षण करण्यास २० जानेवारी रोजी सायंकाळी चंद्रपूर येथे गिनिस रेकॉर्ड ची टीम प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत.२० जानेवारीला, गिनीसच्या जवळपास दोनशे अवघड नियमांची पूर्तता करण्यात जर हा उपक्रम यशस्वी ठरला तर या भव्यदिव्य उपक्रमाची नोंद १८० हुन अधिक देशांत कार्यरत असणाऱ्या गिनीस वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये होईल, भारताच्या नावावर अजून एक जागतिक विश्वविक्रम नोंदवला जाईल आणि रामपणत्यांचा हा प्रकाश आणि रामनामाचा जयघोष जगभरात मानाने आणि अभिमानाने दुमदुमेल असा विश्वास ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे .सुप्रसिद्द अभिनेता पुनित इस्सर (महाभारतातील दुर्योधन) यांच्या रामायण या नाटकाचा प्रयोग दिनांक २१ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. हे नाटक अति भव्य स्वरूपाचे असून यामध्ये ५० पेक्षा जास्त कलाकार काम करत आहेत. रामायणातील अनेक महत्त्वाच्या प्रसंगावर आधारित हे नाटक आहे. मुख्यतः राम आणि रावण यांच्यामधील संवाद व संघर्ष यामध्ये ठळकपणे दिसून येतो.दिनांक २२ जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणात येणार आहे. यामध्ये सुप्रसिद्ध कोरिओग्राफर सुभाष नकाशे हे दीडशे ते २०० कलाकारांना घेऊन रामायण संबंधित सादरीकरणे करणार आहेत. यामध्ये नृत्य, नाट्य, गीत गायन, वादन यांचा समावेशीं असणार आहे. गदिमा व बाबूजी यांच्या अविष्कारातून साकार झालेल्या गीत रामायण मधील काही गाणी व त्यावर आधारित सादरीकरणे ही यावेळेस अनुभवता येणार आहे. प्रभू रामाशी संदर्भातील गाणी आणि गीत रामायणातील काही महत्त्वाची गीते घेवून व रामायणातील काही प्रसंगावर आधारित प्रसंग सादरीकरण होणार आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात राम जन्म अर्थात पाळणा गीताने होईल तर शेवट राम अयोध्यात परतल्यानंतर झालेला जल्लोष आणि राज्याभिषेक दाखवण्यात येईल. याच कार्यक्रमांमध्ये अनुराधा पॉल या विख्यात महिला तबलावादक व त्यांचा चमू रामायणातील काही प्रसंगावर गीत सादरीकरण करणार आहेत.कार्यक्रमाची सांगता जिल्हा व महानगर भाजपाच्या वतीने २२ जानेवारी रोजी फायर शो ने होणार असून या सर्व कार्यक्रमात चंद्रपूरच्या नागरिकांनी उत्साहाने सहभागी व्हावे असे आवाहन ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

**७ जटायू ताडोबात मुक्त करणार !**

**श्रीराम जन्मभूमी येथे अयोध्येत रामरायांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे या पार्श्वभूमीवर रामायणात उल्लेख असलेल्या जटायू अर्थात गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने ताडोबा जंगलातील झरी परिसरात जटायु मुक्त करण्यात येणार असल्याची माहिती ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी दिली. २१ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता झरी येथे हा कार्यक्रम होईल.**


# सनफ्लॅग आयर्न अँड स्टील कंपनीच्या कोळसा खाणीमुळे प्रदूषणाचा धोका - राजेश बेले

## संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश बेले यांची तक्रार

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील सनफ्लॅग आयर्न अँड स्टील कंपनीच्या बेलगांव अंडरग्राऊंड कोळसा खाणीमुळे घातक रासायनिक जल प्रदूषण आणि वायु प्रदूषण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रदूषणामुळे मानवी आरोग्यास धोका निर्माण झाला असून, कंपनीच्या मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करून पर्यावरण परवानगी रद्द करण्यात यावी आणि कोळसा खाण तात्काळ बंद करण्यात यावी, अशी मागणी संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश बेले यांनी केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील बेलगांव अंडरग्राऊंड कोळसा खाणी प्रकल्पामुळे घातक रासायनिक जल प्रदूषण आणि वायु प्रदूषण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील मानवी, जलीय, वन्य आणि पाळीव प्राण्यांवर धोका निर्माण झाला आहे.संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश वा. बेले यांनी या प्रकरणी विभागीय आयुक्त, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी आणि प्रादेशिक अधिकारी यांना निवेदन दिले आहे.निवेदनात बेले यांनी म्हटले आहे की, या प्रकल्पामुळे खाणीतील घातक रासायनिक द्रव्य नदी, नाले आणि शेतजमिनीत सोडले जात आहे. यामुळे परिसरातील पाणी





प्रदूषित झाले आहे. या प्रदूषित पाण्यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच, या प्रकल्पामुळे होणाऱ्या ब्लास्टींगमुळे ध्वनी प्रदूषण होत आहे.या खाणीतून निघणारा कोळसा देखील वायु प्रदूषण करत आहे. यामुळे या परिसरातील नागरिकांना दमा, हृदयविकार, स्कीन विकार, डोळ्यांचे आजार, टी.बी., मेंदुचे आजार, नवजात शिशु व गर्भवती महिला यांना प्रदुषणाचा आजार होत आहे.कोळसा खाणीतुन निघणाऱ्या रासायनिक द्रव्यामुळे संपूर्ण नदी नाले प्रदुषीत झाले आहे. कोळसा खाणीतुन निघणारा रासायनिक द्रव्यामुळे कोळसा खाणीला लागून असलेल्या संपूर्ण शेत जमीन प्रदुषीत झाली आहे. कोळसा खाणीतुन निघणा-या कोळसामुळे घातक वायु प्रदुषण होत आहे. कोळसा खाणीतुन निघणाऱ्या कोळसा रेल्वे साईडींगमुळे घातक वायु प्रदुषण होत आहे. कोळसा खाणीतुन होणा-या कोळसा वाहतुकीमुळे घातक वायु प्रदुषण व रस्त्याचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.बेले यांनी या निवेदनात मागणी केली आहे की, या प्रकल्पामुळे पर्यावरण कायद्याचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे कंपनीच्या मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करून या प्रकल्पाची पर्यावरण परवानगी रद्द करण्यात यावी. तसेच, या प्रकल्पाला तात्काळ बंद करण्यात यावे.या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

# ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रतर्फे शोभायात्रेचे स्वागत



**घुग्घुस । प्रतिनिधी**

शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरुगोविंद सिंह यांच्या ३५८ व्या प्रकाश गुरु पुरब पर्व निमित्त रविवार, १४ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता महान नगर किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. शीखबांधवांतर्फे शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली.


याप्रसंगी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रतर्फे नायब तहसीलदार कार्यालया जवळ शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. तसेच शोभायात्रेत सहभागी शीखबांधवांना शीतपेय वाटप करण्यात आले.यावेळी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, ठाणेदार आसिफराजा शेख, भाजपाचे निरीक्षण तांड्रा, संतोष नुने, पोलिस उप निरीक्षक अशोक बोढे, सिनू इसारप, अनिल बाम, बबलू सातपुते, अमोल थेरे, गणेश कुटेमाटे, हेमराज बोंबले, तुलसीदास ढवस, सुनील राम, धनराज पारखी, असगर खान, सुरेंद्र जोगी, कोमल ठाकरे, पियुष भोंगळे, प्रयास सखी मंच अध्यक्ष किरण बोढे, सुचिता लुटे, वैशाली ढवस, पूजा दुर्गम, आदींची उपस्थिती होती.घुग्घुसच्या गुरुद्वारा सिंह सभा पासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत मोठ्या संख्येत शीखबांधव सहभागी झाले होते. नवीन बसस्थानक, आठवडी बाजार, गांधी चौक, जुना बसस्थानक मार्गे मार्गक्रमण करीत घुग्घुसच्या गुरुद्वारा सिंह सभा जवळ शोभायात्रेचे समापन करण्यात आले.

# जळगाव येथे हायटेक शेती महोत्सव थाटात चंद्रपूर जिल्ह्यातील सातशे शेतकऱ्यांचा सहभाग

**चिमूर । शेषराव राऊत**

जळगाव येथील जगप्रसिद्ध जैन हिल्स येथील जैन हायटेक प्लांट फॅक्टरी येथे हायटेक शेती महोत्सव एक हजार दोनशे शेतकऱ्यांच्या उपस्थितीत थाटात पार पडला यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील सातशे शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.शेतकऱ्यांना विविध जातीचे फळ वर्गीय झाडे त्यांचे संगोपन व कमी खर्चामध्ये कमी कालावधीत येणारी उत्पादन तसेच ठिंबक सिंचनाद्वारे कमी पाण्यामध्ये विज्ञान-तंत्रज्ञान व जैविक तंत्रज्ञान या आधारे शेती कशी केली जाते याचा परिपूर्ण अभ्यास या ठिकाणी शेतकऱ्यांना करता आला.

शेतकऱ्यांना दरवर्षी होणाऱ्या महोत्सवातून शेती विषयक अभ्यास व मार्गदर्शन केल्या जाते प्रत्येक पिकाला व फळझाडांना सूक्ष्म टिंबक सिंचनाद्वारे कमी पाण्यामधून खते औषधी कशी द्यायची याची प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखवण्यात आले या ठिकाणी इजराइल पॅटर्न व त्या आधारे वैज्ञानिक शेती यातून हवामानानुसार आपल्या भागात येणारी पिके यावर संशोधन करून त्या पिकाची तसेच



फळबागांची संकरित रोपे तयार करणे व ती रोपे शेतकऱ्यांना वितरित करणे व त्यांची संगोपन कसे करायचे मार्केटिंग इत्यादी बाबतची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. दिवसेंदिवस निर्माण होत असलेली पाणीटंचाई याचा अभ्यास करून जैन ठिंबक सिंचन या कार्यप्रणालीचा उपयोग करून कमी पाण्यात व्यवस्थापन करण्यास शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कंपनीने जैन पाईप्स सूक्ष्म टिंबक पाईप तसेच त्यासाठी लागणारे छोटे छोटे पार्ट तयार करून कमी किमतीमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहेत.त्यामुळे फक्त तीस टक्के पाण्यामध्ये शेती ही करता येऊ शकते व ७० टक्के पाण्याची बचत करता येते.या कार्यक्रमाप्रसंगी चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हा कृषी अधीक्षक शंकरराव तोटावर यांचे शेतकऱ्यांना शेती विषयक विविध विषयावर मार्गदर्शन लाभले तसेच या कार्यक्रमात कृषी पर्यवेक्षक गोकुळ बनसोड, रुपेश सोनवणे कृषी सहाय्यक तेजपाल एसनकर, गणेश उमाटे, नितीन मोरे, प्रताप रेंगे, पाराजी सदगर, बाबासाहेब आडे, तर प्रगतशील शेतकरी अविभाऊ बारोकर कमलाकर ठाकरे, नामदेव चापले तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यातील ७०० शेतकरी उपस्थित होते.

# 'रामदेवबाबांना अटक करा', राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे आंदोलन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

काही दिवसांपासून समाज माध्यमांवर रामदेवबाबा यांची एक 'क्लिप' सार्वत्रिक होत आहे. त्यामध्ये ते स्वतःला अग्निहोत्री ब्राह्मण म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत असून ओबीसी समाजाचा अपमान करीत असल्याचे दिसत आहे. यामुळे राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रामदेवबाबा यांच्या विरोधात १५ जानेवारीला निदर्शने व निषेध आंदोलन करण्यात आले.




रामदेवबाबांना अटक करण्याची मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी केली आहे. बाबांची दुकानदारी या देशातील ६५% ओबीसी समाजाच्या खरेदी विक्री करून चालत आहे याचे भान या भांडवलदारी बाबाने राखावयास पाहिजे, समाजामध्ये सामाजिक गतिरोध निर्माण करुन ओबीसी समाजाविषयी अपशब्द बोलणे टाळले पाहिजे, अन्यथा यांच्या दुकानासमोर राष्ट्रीय ओबीसी महासंघ आंदोलन करेल, असे आंदोलन दरम्यान सांगण्यात आले. रामदेवबाबांनी १५ दिवसांत माफी न मागितल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.राष्ट्रीय ओबीसी महासंघ प्रदेश कार्याध्यक्ष दिनेश चोखारे, ओबीसी योद्धा विजय बलकी, प्रेमानंद जोगी, गणेश आवारी, डॉ संजय घाटे, कर्मचारी संघटनेचे देवराव दिवसे, प्रदीप पावडे, रजनी मोरे, अजय बलकी, रोशन पचारे, गोविंदा उपरे, विलास भगत, रंगराव पवार, पवन अगदारी, नागेश बोडे, अतुल मोहितकर,नंदू टोंगे, सुरेश विधाते, रणजित पिंपलशेडे, तुळशीराम देरकर, संतोष बांदूरकर, दिनेश भोंगडे, भास्कर सोनेकर लखन हिकरे इ. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .